# ‘आरडीएसओ’ चाचणी पूर्ण

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १० : मेट्रो-३च्या आरे-बीकेसी या पहिल्या टप्प्याची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या उपस्थितीत लवकरच चाचणी सुरू होणार आहे. या मार्गाची संशोधन डिझाईन आणि मानक संस्थेच्या (आरडीएसएओ) चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात सुरक्षा चाचणीसाठी मेट्रो सुरक्षा आयुक्तांना बोलावले जाणार आहे.

ही चाचणी यशस्वी झाल्यानंतर मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल होऊ शकेल. देशातील सर्वात लांब भूमिगत मेट्रो असलेल्या आरे-कफ परेड या मार्गाची लांबी ३३.५ किलोमीटर आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात आरे बीकेसी हा १२.५ किलोमीटरच्या टप्प्यात नऊ स्थानके आहेत. त्यांचे शंभर टक्के सिव्हिल काम झाले असून इलेक्ट्रिक आणि इतर प्रकारचे ९७ टक्के काम झाले आहे. दरम्यान पालिकेच्या अग्निशमन दलाने सर्व तपासण्या केल्या असून उर्वरित इलेक्ट्रिक कामे अंतिम टप्प्यात आहेत. त्यामुळे आता पुढील आठवड्यात सुरक्षा चाचणीसाठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांना तपासणीसाठी बोलावण्यात येणार असल्याचे ‘एमएमआरसीएल’ने स्पष्ट केले आहे.